## प्रकरण पहिले

# प्रस्तावना

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण १ ले

# प्रस्तावना

**प्रस्ताविक -**

समाजातील वाईट प्रवृत्तींनी ग्रासलेल्या व्यक्तिंना त्यांच्यात परिवर्तन घडवून समाजातील एक सुजाण नागरिक बनवण्याचे कारागृह हे एक ठिकाण आहे. आज चित्रपटांमध्ये व विविध प्रसारमाध्यमातून दाखविले जाणारे कारागृह, तेथील कैदी, तेथील प्रशासन यामुळे समाजाची कारागृहाकडे, तेथील कैद्यांकडे पाहण्याची जी मानसिकता, संकुचित दृष्टीकोन आहे ते बदलणे आवश्यक आहे. कारण व्यक्ती हा जन्मजात गुन्हेगार नसतो, गुन्हेगार बनवते ती त्यावेळची परिस्थिती. त्यामुळे कारागृहातून शिक्षा भोगून परत बंदी बाहेर आल्यानंतर त्याचा प्रत्यक्ष समाजाशी संबंध येत असतो. अशावेळी कारागृहातून बाहेर आलेला बंदी समाजामध्ये समरस होवून, एक सुजाण नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी, पुन्हा त्याच्या हातुन गुन्हा घडू नये व त्याचे योग्यरित्या पुनर्वसन होण्यासाठी समाजाने बंद्यांना पुन्हा समाजात एक माणूस म्हणून स्विकारणे व माणुसकीची वागणूक देणे आवश्यक आहे. यासाठी समाजाने आपली मानसिकता, पूर्वग्रहदुषितपणा, संकुचित दृष्टीकोण बदलण्याची आवश्यकता आहे.

समाजाचे गुन्हेगारांपासून संरक्षण करून गुन्हेगारांच्यात परिवर्तन करणारी ही कारागृहे आपल्या समाज व्यवस्थेचा एक मूलभुत घटक असून संशोधनाच्या क्षेत्रात दुर्लक्षित राहिलेला घटक आहे. आजपर्यंत ऐतिहासिक दृष्टीकोनातून या विषयावरती संशोधन झालेले नाही. या विषयावरती संशोधन होणे आवश्यक आहे. कारण माझा विषय हा लोकप्रबोधन व समाज प्रबोधन करणारा आहे.

प्रस्तुत आभ्यासाच्या अनुषंगाने आजवर दुर्लक्षित राहिलेल्या कळंबा मध्यवर्ती कारागृहाच्या इतिहासावर प्रकाश टाकणे हे संशोधनाचे उद्दिष्ट आहे. यामुळे या संशोधनाचा जास्तीत जास्त उपयोग समाजाला व संशोधकांना व्हावा या हेतूने हा विषय मी माझ्या संशोधनासाठी निवडला आहे.

**विषयाची व्याप्ती -**

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती केवळ कोल्हापूर शहर आणि कोल्हापूर शहरामधील मध्यवर्ती कारागृह कळंबा एवढ्यापूरती मर्यादित असून त्यात कोल्हापूरचे भौगोलिक स्थान, ऐतिहासिक पार्श्वभुमि, कोल्हापूर शहरातील तुरुंगव्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभुमी, व कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह कळंबा या विषयावरती उपलब्ध संशोधन साधनांच्या साहाय्याने हा अभ्यास पूर्ण केला आहे.

आधुनिक काळात प्रत्येक विषयाची व्याप्ती खूपच वाढली आहे. परिणामी एकट्या अभ्यासकाला ते शक्य होत नाही. तो फक्त विषयांचा काही पैलूंचा खोलवर अभ्यास करू शकतो. हे गृहीत धरून जी साधने उपलब्ध झाली. त्या साधनांच्या आधारावर प्रस्तुत संशोधनात अभ्यास विषयाची मांडणी केली आहे. या कारागृहाच्या संदर्भात जे पुरावे मिळाले ते प्रामाणिकपणे, चिकित्सक पध्दतीने घेतले आहेत. व या कळंबा मध्यवर्ती कारागृहाचा ऐतिहासिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

इतिहासाची व्याप्ती मोठी असल्याकारणामुळे इतिहासातील एखाद्या भागावर लक्ष केंद्रीत करून त्या भागाची, प्रदेशाची शहराची, कारागृह यंत्रणेची सविस्तर माहिती देणे अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे असते. विभागाचा अभ्यास करताना निगडीत असलेल्या बाजूंना प्राध्यान्य देण्याचा प्रयत्न केला आहे.

स्थानिक इतिहासाच्या आधारे राष्ट्रीय इतिहास अधिक समृध्द बनविता येऊ शकतो. हा इतिहास विशिष्ट ठिकाणाशी निगडीत असला तरी अनेक स्थानिक घटनांचा राष्ट्रीय इतिहासाशी संबंध येऊ शकतो. किंवा येत असतो. तेंव्हा स्थानिक इतिहासामुळे राष्ट्रीय इतिहासावर व तसेच प्रमुख घटनांवर प्रकाश टाकणे शक्य होत असते. नेमका हाच धागा पकडून 'कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह कळंबाचा अर्वाचिन इतिहासावर कारागृहाच्या अनुषंगाने उपलब्ध असणाऱ्या साधनांवरून माहिती घेवून एक नविन संशोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.

१. माझ्या संशोधनातून स्थानिक परिस्थितीची माहिती मिळते.

२. स्थानिक दृष्टीने महत्त्वपूर्ण ऐतिहासिक बाबींवर अभ्यास करता येईल.

३. स्थानिक इतिहासाच्या माध्यमातुन इतिहासाविषयीची आवड निर्माण करता येईल.

**संशोधनाची उद्दिष्टे** - कळंबा मध्यवर्ती कारागृहाचा अभ्यास करतांना पुढील उद्दिष्टे समोर ठेवून प्रबंधाची मांडणी केली.

१. कळंबा मध्यवर्ती कारागृहाची निर्मिती होण्यापाठीमागची ऐतिहासिक पार्श्वभुमि अभ्यासणे.

२. त्याआधारे कोल्हापूर शहरातील तुरुंगव्यवस्थेच्या इतिहासावर प्रकाश टाकणे.

३. कळंबा मध्यवर्ती कारागृहाची प्रशासनव्यवस्था अभ्यासणे.

४. कारागृहाचे अंतर्गत व्यवस्थापन अभ्यासणे व त्यावरती प्रकाश टाकणे.

५. कारागृहात बंदिजनांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, त्यांचा नित्यक्रम अभ्यासणे.

६. कारागृहात बंद्याच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी राबविले जाणारे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम अभ्यासणे.

७. कारागृहात बंद्याच्या पुनर्वसनासाठी राबविले जाणारे व्यावसायिक उपक्रम अभ्यासणे व त्यावरती प्रकाश टाकणे.

८. कारागृहाचा भूतकाळाचा आढावा घेवून वर्तमान काळात काही सुधारणांची आवश्यकता आहे का? यावरती प्रकाश टाकणे.

**साधने -**

या संशोधनासाठी ऐतिहासिक व समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे. आतापर्यंत कोल्हापूर शहरातील 'कळंबा मध्यवर्ती कारागृहाचा ऐतिहासिक दृष्टीकोनातुन अभ्यास झालेला नाही. त्यामुळे कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे संदर्भग्रंथ उपलब्ध नाहीत. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी मूळ साधने काही प्रमाणात उपलब्ध झाली असून ती अप्रकाशित आहेत. कारागृहाचे स्वतंत्र रेकॉर्ड असून ते बऱ्याच अंशी अप्रकाशित आहे. कारागृहातील उपलब्ध अप्रकाशित कागदपत्रांचा, कारागृहाच्या मासिक व वार्षिक ताळेबंदाचा, कारागृहाची माहिती पुस्तिका तसेच महाराष्ट्र काहरागृह नियमावली १९७९, महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत नागरिकांची सनद या उपलब्ध प्राथमिक साधनांचा तसेच कोल्हापूर पुरालेखागारातून उपलब्ध काही मुळ प्राथमिक साधनांचा मी माझ्या संशोधनासाठी उपयोग केला आहे. त्याचप्रमाणे दुय्यम साधनांचा ही माझ्या संशोधनासाठी मी उपयोग केला आहे. त्यामध्ये विविध वृत्तपत्रे, मुलाखती, दुय्यम साधन ग्रंथ, इंटरनेट यांचा माझ्या संशोधनासाठी उपयोग केला आहे. विषयाची मांडणी करतांना कोठेही पुर्वग्रह दुषित विधाने केलेली नाहीत. वस्तुनिष्ठ पध्दतीने विषयाची मांडणी केलेली आहे.

**प्रकरणांची विभागणी -**

प्रकरणांची विभागणी पुढील सहा प्रकरणांत केला आहे.

१. प्रस्तावना

२. कळंबा मध्यवर्ती कारागृहाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

३. कळंबा मध्यवर्ती कारागृहाची प्रशासनव्यवस्था व अंतर्गत व्यवस्थापन

४. बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी कारागृहात राबविले जाणारे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम.

५. बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी कारागृहात राबविले जाणारे व्यावसायिक उपक्रम.

६. उपसंहार

**प्रकरण रचना -**

**प्रकरण पहिले - प्रस्तावणा**

या प्रकरणामध्ये प्रस्तावणा व संशोधन पध्दती मांडून प्रकरण रचनेचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

**प्रकरण दुसरे - कळंबा मध्यवर्ती कारागृहाची ऐतिहासिक पार्श्वभूमी -**

सदर प्रकरणामध्ये कळंबा मध्यवर्ती कारागृहाची निर्मिती होण्यामागीलमागची ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास केला आहे. त्याबरोबरच कारागृह ही संकल्पना कधीपासून अस्तित्वात आली असावी, कारागृहाचा ग्रंथिक उल्लेख. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील कारागृहाची रचना, व्याख्या, प्रचलित शब्द, कारागृह योजनेमागील दृष्टीकोन, कारागृह यंत्रणा उत्पत्ती

त्याचबरोबर कळंबा कारागृहाची निर्मिती, मध्यवर्तीचा दर्जा या सर्व घटकांचा अभ्यास सदर प्रकरणात केला आहे.

**प्रकरणे तिसरे - कळंबा मध्यवर्ती कारागृहाची प्रशासनव्यवस्था व अंतर्गत व्यवस्थापन -**

सदर प्रकरणामध्ये कळंबा मध्यवर्ती कारागृहाची प्रशासन व्यवस्था व अंतर्गत व्यवस्थापन त्यामध्ये कारागृहातील सर्व विभाग, त्यांचे कामकाज, स्त्री बंदी विभाग व पुरूष बंदी विभाग यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, शिस्त, कारागृहात निषिध्द असणाऱ्या वस्तु या सर्व घटकांचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.

**प्रकरण चौथे - बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी कारागृहात राबविले जाणारे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम -**

सदर प्रकरणामध्ये बंदिजणांच्या सुधारणा व पुर्नवसनासाठी राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती घेतली आहे.

**प्रकरण पाचवे - बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी कारागृहात राबविले जाणारे व्यावसायिक उपक्रम -**

सदर प्रकरणामध्ये बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी कारागृहात राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक उपक्रमांची माहिती घेतली आहे.

**प्रकरण सहावे - उपसंहार -**

सदरच्या प्रकरणामध्ये वरील पाच प्रकरणांचा सारांश देण्यात आला आहे. तसेच या विषयाच्या सखोल अभ्यासातून बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी व कारागृहात आणखी कोणत्या सुधारणांची आवश्यकता आहे याची सविस्तर माहिती या प्रकरणात दिली आहे.